वाचले:-

१] म.न.महापालिका सभा ठराव क्र. ७००८ दि. १९.३.९९

२] महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचा क्र. पीसीसी ३०९९/२१२८/प्र.क्र. २०६/९९/ नवि-२२ दि. १ नोव्हेंबर २००० चा मंजूर आदेश

३] दि. १३.१२.२००० रोजीची मंजूर टिप्पणी.

---

स्थायी आदेश
==========

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
कर आकारणी व करसंकलन विभाग
क्रमांक- कर/मुख्य/६/कावि/१६३५/२०००
दिनांक- २०.१२.२०००

विषय:- मिळकत जप्ती व विक्री खर्च फी वसुलीबाबत.

आदेश

महानगरपालिका ज्या मिळकतधारकाकडे मिळकतकराची थकबाकी असते अशा मिळकतधारकांची मालमत्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ नियम ४२,४३,४४,४५,४७,५० मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेची ..., जप्ती करते व त्यानंतर सदर मालमत्तेची विक्री केली जाते. सदरच्या मिळकती जप्त केलेनंतर किंवा विक्रीची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापूर्वी मिळकतधारक मिळकतकराची थकबाकी भरण्यासाठी आले असता मिळकतधारकाकडून मिळकत जप्ती वॉरंट फी व लिलाव विक्रीचा खर्च वसुली करणे आवश्यक असते. याबाबत महानगरपालिकेने उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये धोरण ठरविले आहे. या धोरणास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांनी उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ या आदेशान्वये खालील नमूद केलेप्रमाणे जप्ती वॉरंट फी व लिलाव खर्च फी वसुल करणेस मान्यता देत आहे.

१] स्थावर मालमत्ता जप्त केलेनंतर मिळकतधारकाकडून येणे असलेल्या सामान्य कराच्या १०% रक्कम जप्ती वॉरंट फी सदराखाली वसूल करावी मात्र वरील थकबाकी रक्कम मिळकतधारकाने जप्ती नोटीसचे विहीत कालावधीत संपूर्ण थकबाकीसह एका हप्त्यात जमा केल्यास वॉरंट फी रद्द करण्याचा अधिकार कर आकारणी व करसंकलन प्रमुख यांना राहील.

२] स्थावर मालमत्ता विक्रीसाठी जाहिर नोटीस प्रसिध्द झालेनंतर मिळकतधारकाकडून जप्ती वॉरंट फी व्यतिरिक्त जादा येणे असलेल्या सामान्य कराच्या १५% रक्कम लिलावखर्च सदराखाली वसूल करण्यात यावी.

वरील नमूद केलेप्रमाणे संबंधितांनी वसुली करणेचे धोरण अवलंबिणेत यावे

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.

-82